# ज्ञानाचा समाज उन्नतीसाठी उपयोग व्हावा – डॉ. दिगंबर नेटके

देगलूर । प्रतिनिधी

देगलूर– २००५ नंतर जागतिकीकरणाला वेग आल्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रातही काळानुसार अनुरूप बदल करणे आवश्यक आहे. प्राप्त ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करणे अत्यंत आवश्यक असून शिक्षकांनी सेवाभाव ठेवून अध्यापन केल्यास समाजाची उन्नती होईल. माणसाच्या जीवनातील प्रत्येक व्यवहाराला नैतिक अधिष्ठान महत्त्वाचे असल्याने विद्यार्थ्यांने भावी काळात वाटचाल करताना आपली क्षमता व मर्यादा लक्षात घेऊन वाटचाल केली पाहिजे असे प्रतिपादन डॉ. दिगंबर नेटके यांनी व देगलूर महाविद्यालयात, पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार यांची उपस्थिती होती. देगलूर महाविद्यालयात पदवी – पदव्युत्तर शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी २६ वा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ ०१ मार्च



२०२४ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. एम. के. पाटील म्हणाले की, सध्याची शिक्षण व्यवस्था संक्रमण अवस्थेतून जात आहे, नवे शैक्षणिक धोरण येऊ घातल्यामुळे सर्वांना त्यास सामोरे जाण्यासाठी तयारी करणे आवश्यक आहे. गुणवत्ताप्रधान शिक्षणच समाजाला प्रगतीकडे नेऊ शकते. प्राचीन काळात तक्षशिला आणि नालंदा विद्यापीठाने जगाला मार्गदर्शन करण्याचे काम केले आहे. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्यामुळे विद्यार्थ्यांनी विविध कौशल्य आत्मसात करावीत. महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढणे अत्यंत आवश्यक असून विद्यार्थ्यांच्या आवडीचे विषय आणि तसा अभ्यासक्रम आखण्याची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी केले. याप्रसंगी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य जनार्धन चिद्रावार, रवींद्र धाडे, देवेंद्र मोतेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. संजय पाटील, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. किशन मुनेश्वर, डॉ. मुदाम लक्ष्मणकुमार, श्री राजू जेगीलवार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मिरवणुकीने झाली. दीपप्रज्वलन आणि स्वामीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विद्यापीठ गीताने समारंभास प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. रत्नाकर लष्करे यांनी केले तर आभार डॉ. विनय भोगले यांनी मानले. याप्रसंगी एकूण १५० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. समारंभाच्या यशस्वीतेसाठी डॉ. माधव चोले, डॉ. सचिन कांडेकर, डॉ. भानुदास नरवाडे, डॉ. राजकुमार पोकलवार, डॉ. सुरेश काशिदे, प्रा. गणेश क्यादारे, प्रा. विनोद काळे, अधीक्षक गोविंद जोशी, प्रशांत चौव्हाण, अशोक मामीडवार, प्रकाश सोनकांबळे, किशन पांचाळ व नियोजन समितीतील सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.